माहितीचा अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

---

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ६२२/२०२३**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | **जन माहिती अधिकारी** | **प्रथम अपिलीय अधिकारी** |
| श्री. पांडूरंग रामरावजी गायकी, प्लॉट नं. १०२, टाईप२, विंग-ए, कस्तुरी नगर, गोठाळ पांजरी, नागपूर | उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर | कार्यकारी अभियंता (बांधकाम) विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १३.११.२०२५**

**१. उपस्थिती –**

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| **उपस्थित** | **उपस्थित** | **अनुपस्थित** | **प्रतिनिधी उपस्थित** | **अनुपस्थित** |

**२. व्दितीय अपील अर्ज –**

(१) व्दितीय अपील अर्जाचा दिनांक : ०६.०३.२०२३

(२) व्दितीय अपील प्राप्त झाल्याचा दिनांक : ०६.०३.२०२३

(३) व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे : अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही.

(४) व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती : माहिती मिळण्याबाबत विनंती केलेली आहे.

**३. माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : ०८.१२.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : ०८.१२.२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : सन २०१७ ते २०२२ पर्यंत.

(४) **जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती :** १. कामावर पाच वर्षात कोण-कोणत्या निधीमध्ये कामे करण्यात आली. २. संबंधीत कामावर किती शासनाचा निधी खर्च करण्यात आला. ३. या कामावर किती वेळा निधी प्रक्रिया करण्यात आली असून कंत्राटदाराचे नवे कार्यारंभ आदेश याची प्रत पूर्ण कालावधीची प्रत ४. देखभाल कालावधी किती वर्षाचा होता त्याची प्रत तत्काळ देण्यात यावी, याबाबत माहिती मागितलेली आहे.

(५) **जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही** : अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

**४. प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : २५.०१.२०२३

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २५.०१.२०२३

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही.

(४) **अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही** : अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

**५. युक्तीवाद/लेखी खुलासा –**

१. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर श्री. दिनेश मुनेश्वर उपस्थित आहेत. विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (बांधकाम) विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर यांचेतर्फे जी.एस. चौधरी उपस्थित आहेत.

२. आज सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित असून त्यांनी नमूद केले की, जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत व आजपर्यंत कोणतीही माहिती दिलेली नाही. त्यामुळे संपूर्ण माहिती देण्याबाबत संबंधीतांना आदेशीत करावे.

३. आज सुनावणी दरम्यान प्राधिकरणाच्या वतीने नमूद केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जानुसार तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिलेला नाही. त्यामुळे आता माहिती देता येईल, असे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले.

**६. निष्कर्ष** – सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरुन आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१. सदर प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही कायमस्वरुपी अभिलेख असल्यामुळे सदर माहितीचा, हा आदेश प्राप्त झाल्यापासून ७ दिवसांच्या आत कसून शोध घेण्यात यावा आणि कार्यालयीन अभिलेखावर उपलब्ध असलेली माहिती आढळून आल्यास अपिलार्थी यांना सदर माहिती समक्ष/नोंदणीकृत टपालाने तत्काळ विनामुल्य पुरवावी.

२. सदर प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जावर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे त्यांचेकडून कलम २० अन्वये खुलासा मागविणे क्रमप्राप्त ठरते.

सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## अंतरिम आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ७ दिवसाच्या अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०८.१२.२०२२ रोजीच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने त्यांनी मागितलेल्या माहिती संदर्भात कार्यालयातील उपलब्ध माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर नोंदणीकृत पोचदेय डाकेने तत्काळ विनामुल्य पुरवावे. व त्याची पोहच आयोगास सादर करावी. तसेच जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विवक्षित उत्तर देखील अपिलार्थी यांना पाठवावे.

२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) विभाग, जिल्हा परिषद कार्यालय, नागपूर, यांचेविरुध्द वरील निरीक्षणांच्या आधारे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २० अन्वये कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगास सदर आदेश प्राप्त होताच १५ दिवसात सादर करावा. जर विहित मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त झाला नाही तर त्यांचे काहीही म्हणणे नाही, असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम करण्यात येतील याची नोंद घ्यावी. सदर आदेशाची प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना मिळेल याबाबतची विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी खातरजमा करावी.

३. वरील निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

(गजानन निमदेव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १३.११.२०२५**

जावक क्रमांक 8604 दिनांक 19 JAN 2026

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर